# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : १०
## सभावृत्तांत

दिनांक : २०/११/२००९ वेळ : दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दि.२०/११/२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
४. मा.खोमणे लता हनुमंत
५. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
६. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.पवार - प्रशासन अधिकारी,मा.चाकणकर -उपनगरसचिव, मा.थोरात,मा.बनकर,मा.कपिले,मा.जाधव - कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-

विषय क्रमांक :- ७) निविदा क्र.२९/११५ - ०७ - ०८ चे कामाबाबत..मा.अख्तरहुसेन चौधरी,मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ८) चिंचवड वॉर्ड क्र.६४ येथे “पैसे द्या व वापरा” तत्वावर संडास ब्लॉक बांधणेबाबत..मा.प्रकाश बाबर,मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ९) रहाटणी गावठाण भागात इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणेचे खर्चाबाबत..मा.प्रकाश बाबर,मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १०) वाकड परिसरातील नव्याने झालेल्या रस्त्यांवर प्रकाश व्यवस्था करणेबाबत..मा.स्मिता गुंजेकर,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ११) तळवडे येथे बैलगाडी शर्यतीचा घाट व कुस्त्यांचा आखाडा बांधणेबाबत..मा.लता खोमणे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १२) मनपा नवीन सभागृहात सुभाषित लावणेबाबत..मा.लता खोमणे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १३) वॉर्ड क्र.७५ मधील काटेवस्ती,विश्वशांती कॉलनी व पिंपळे सौदागर गावठाण भागातील लघुदाब वीजवाहिनीच्या तारा काढुन भूमिगत केबलव्दारे विजपुरवठा करणेच्या खर्चाबाबत.. मा.लता खोमणे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १४)रहाटणी वॉर्ड क्र.७६ गावठाण व रामनगर या भागातील लघुदाब वीजवाहिनीच्या तारा काढुन भुमिगत विजवाहिन्या टाकणेच्या खर्चाबाबत..मा.लता खोमणे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १५) ड प्रभागातील वॉर्ड क्र.७७ रहाटणी येथे दिवाबत्ती व्यवस्थेचे नुतनीकरण करणेबाबत..मा.लता खोमणे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १६) रहाटणी वॉर्ड क्र.७६ मधील शिवराजनगर व गजानन नगर येथे भुमिगत विजवाहिन्या टाकणेबाबत.. मा.लता खोमणे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १७) रहाटणी श्रीनगर परिसरातील वॉर्ड क्र.७७ येथे भूमिगत केबलव्दारे विजपुरवठा करणेबाबत..मा.लता खोमणे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १८) अ प्रभाग अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेकामी मजुर कर्मचारी पुरविणेबाबत..मा.स्मिता गुंजेकर,मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १९) पिं.चि.मनपाचे आरक्षण क्र.४० अ पीसीएमटी बसडेपो येथील फर्निचर व केबिन्सचे कामाचे साईट बदलाबाबत..मा.स्मिता गुंजेकर,मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव..

ठराव क्रमांक :- २०० विषय क्रमांक :- १
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/१९३/०९ दि.९.२.०९
(क्र.प्रशा/२/कावि/१५०२/०९ दि.५/११/०९)
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

श्री.ऐवले संभाजी भगवान, समाजसेवक यांना पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार सहाय्यक समाज विकास अधिकारी या पदावर र.रु.५५०० इ ९००० या वेतनश्रेणीमध्ये (पे बँड र.रु.९३०० -३४८०० व ग्रेड पे र.रु.४३०० मध्ये)पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २०१ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/३अ/कावि/१०७१/०९ दि.५.११.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

प्रस्तावाप्रमाणे भाग - १ मधील नमुद २० कर्मचा-यांना मुकादम पदावर पदोन्नतीने नेमणुका देण्यास तर भाग - २ मधील नमुद २९ कर्मचा-यांकडुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवुन मुकादम पदावर पदोन्नतीने नेमणुका देण्यास आणि भाग ३ मध्ये नमुद केलेल्या प्रतिक्षा यादीवरील १० उमेदवारांना पद उपलब्धतेनुसार त्यांचेकडुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेउन मुकादम पदावर पदोन्नतीने नेमणुका देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २०२ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/१५०३/०९ दि.५.११.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशी व निर्देशानुसार पदोन्नतीबाबत कार्यवाही करुन, पदोन्नती समितीने तयार केलेल्या निवड यादीवरील १९ कर्मचा-यांना व प्रतिक्षा यादीवरील ४ कर्मचा-यांना र.रु.५२०० - २०२०० ग्रेड पे २४०० या वेतनश्रेणीत आरोग्य सहाय्यक या पदावर पदोन्नती देण्यास त्याचप्रमाणे निवड तसेच प्रतिक्षा यादीची मुदत, पदोन्नती समिती सभेच्या दिनांकापासून १ वर्ष अशी निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २०३ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : विद्युत
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन तालुकदार
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कप्र/वि/जा/८३६/०९ दि.५.११.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

भोसरी रुग्णालयातील लिफ्ट बदलणे व देखभाल दुरुस्तीची वार्षिक पध्दतीने कामे करणेकामी र.रु.१३,३१,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २०४ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. प्रशा/२/कावि/१५२३/०९ दि.९.११.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

पदोन्नती समितीने मुख्य लिपीक पदावर पदोन्नतीसाठी शिफारस केल्याप्रमाणे निवड यादी [ अ.क्र.१ ते १६ ] व प्रतिक्षा यादी [ अ.क्र. १ ते ८ ] तयार केली असल्याने पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशी व निर्देशानुसार पदोन्नतीबाबत कार्यवाही करुन, पदोन्नती समितीने तयार केलेल्या निवड यादीतील अ.क्र.५,१० व १५ तसेच प्रतिक्षा यादीवरील अ.क्र.८ वरील लिपीक कर्मचा-यांची वयाची ४५ वर्षे पुर्ण झालेली असल्याने शासन निर्णयानुसार एल.एस.जी.डी परिक्षेत सूट देवुन त्यांना तसेच निवड व प्रतिक्षा यादीवरील उर्वरित अन्य कर्मचा-यांना र.रु.९३०० - ३४८०० ग्रेड पे ४३०० या वेतनश्रेणीत मुख्य लिपीक या पदावर पदोन्नती देण्यास त्याचप्रमाणे निवड तसेच प्रतिक्षा यादीची मुदत, पदोन्नती समिती सभेच्या दिनांकापासून १ वर्ष अशी निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २०५ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. प्रशा/१/कावि/१३०९/०९ दि.११.११.०९
विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील “प्राचार्य” या अभिनामाचे रिक्त पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवाराचे नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत..

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक :- २०६ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.अख्तरहुसेन चौधरी, मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...

निविदा क्र.२९/११५-२००७-२००८ चे कामांतर्गत स्वप्नपुर्ती अपार्टमेंटच्या मागील बाजुस रिटेनिंग वॉल बांधणेचे काम चालू आहे. तथापि त्याच प्रभाग क्र.५५ मधील से.क्र.२६ येथिल गणेश तलावाच्या बाजुस सद्यस्थितीत संरक्षक भिंत नसल्यामुळे रस्ता खचला आहे. त्यामुळे त्याठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे. तरी निविदा क्र.२९/११५/२००७-२००८ या कामांतर्गत गणेश तलावाच्या बाजुची भिंत बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २०७ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.प्रकाश बाबर, मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...

चिंचवड येथील वॉ.क्र.६४ येथील पॉवर हाऊस चौकाजवळ असलेले संडास ब्लॉक जूने झाले असुन त्याठिकाणी दुर्गंधी पसरते. सदर ठिकाणच्या नागरिकांच्या सोयीचे दृष्टीने सदर ठिकाणी असलेले जुने संडास ब्लॉक पाडून त्या ठिकाणी नव्याने स्त्री व पुरुष यांचेसाठी स्वतंत्र संडास ब्लॉक,मुतारी इ. 'पैसे द्या व वापरा' या तत्वावर बांधण्यात यावे. त्यासाठी अशा प्रकारचे कामे करणाऱ्या मे.बालाजी इंजिनिअर्स,निगडी प्राधिकरण या संस्थेकडून करारनामा करुन घेऊन त्याप्रमाणे कामे करण्यासाठी येणाऱ्या र.रु.४९,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २०८ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.प्रकाश बाबर, मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...

प्र.क्र.७६ रहाटणी गावठाण भागात इंटरलॉकींग ब्लॉकचे कामास (नि.नो.क्र.२९/ १००-२००७-२००८ नि.र.रु.४०,२३,८६५/-) दि.८/१२/२००८ रोजी कामाचा आदेश देण्यात आलेला असला तरी त्या भागातील नागरिकांची मागणी विचारात घेता व कामाची निकड विचारात घेता अजून कामे करणे आवश्यक असल्याने र.रु.९८,००,०००/- पर्यंतचे सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २०९ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.स्मिता गुंजेकर, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव...

मुंबई-बेंगलोर महामार्गावरील वाकड पोलिस चौकी ते मुळा नदी पुलापर्यंतच्या रस्त्यावर दुभाजकामध्ये स्ट्रीटलाईट व्यवस्था करणे हे निविदा काम निविदा नो.क्र.१८/०४-२००७/०८ अन्वये मे.यश इलेक्ट्रोलाईन या एजन्सीमार्फत सुरु आहे. सदर कामांतर्गत अंदाजे १० लाख रक्कमेचे होणाऱ्या सेव्हींगमधून कामाचे संलग्न वाकड परिसरातील नव्याने झालेल्या रस्त्यांवर प्रकाश व्यवस्था करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २१० विषय क्रमांक :- ११
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.लता खोमणे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव...

तळवडे या गावी बैलगाडा,कुस्ती शौकीन बरेच असून तेथे बैलगाडा शर्यतीचा घाट व कुस्त्यांचा आखाडा बांधणेकामी र.रु.४५,००,०००/- तरतूद करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २११ विषय क्रमांक :- १२
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा. लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.लता खोमणे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव...

"लोकशाहीचे मंदिर हे सुंदर। संभाषण घडो मधुर निरंतर।।
सत्य,न्याय,शांतीचा राहो आदर। जनहित विकासाचे गाठू उत्तुंग शिखर।।"

हे सुभाषित म.न.पा. नविन सभागृहात लावणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २१२ विषय क्रमांक :- १३
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.लता खोमणे , मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रहाटणी परिसरातील वॉर्ड क्र.७५ मधील काटेवस्ती,विश्वशांती कॉलनी व पिंपळे सौदागर गावठाण या भागातील उर्वरित ठिकाणी घराजवळून तसेच काही घरांच्या गॅलरीतून म.रा.वि.म.कंपनीच्या लघुदाब विजवाहीनी तारा गेलेल्या आहेत. पावसाळ्यात सदरच्या तारांमुळे नागरिकांच्या जिवितास धोका होण्याची शक्यता आहे. सबब सदरच्या तारा काढून भूमिगत केबलद्वारे विजपुरवठा करणेच्या कामासाठी र.रु.४८ लाखाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २१३ विषय क्रमांक :- १४
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा. लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.लता खोमणे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव...

रहाटणी वॉर्ड क्र.७६ मधील रहाटणी गावठाण व रामनगर या ठिकाणी काही भागात लघुदाब विजवाहक तारा नागरिकांचे घरावरुन व गच्चीवरुन गेलेल्या आहेत. त्यामुळे अपघात होण्याचे प्रमाण वाढले असून एक दोन प्राणंतिक अपघातही घडलेले आहेत. तसेच सदर वाहिन्यांचे खांब रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरत आहेत. तरी वरील ठिकाणी धोकादायक ठरणाऱ्या खांब व तारा हलवून भूमिगत विजवाहिन्या टाकणेच्या कामासाठी र.रु.४८,००,०००/- च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २१४ विषय क्रमांक :- १५
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.लता खोमणे, मा. प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव...

ड प्रभागाकडील वॉर्ड क्र.७७ रहाटणी श्रीनगर मधील काही भागात स्ट्रीटलाईट व्यवस्थेतील खांब बरेच जुने झालेले असून काही ठिकाणी तळाजवळ गंजलेले आहेत. तसेच बऱ्याच ठिकाणी पाणीपुरवठ्याच्या व ड्रेनेजच्या कामात स्ट्रीटलाईटच्या भूमिगत केबल नादुरुस्त झालेल्या आहेत. तरी सदर कामासाठी सन २०१०-२०११ च्या अंदाजपत्रकात र.रु.३०,००,०००/- ची तरतूद करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २१५ विषय क्रमांक :- १६
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.लता खोमणे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव...

रहाटणी वॉर्ड क्र.७६ मधील शिवराजनगर व गजानन नगर या ठिकाणी काही भागात लघुदाब विजवाहक तारा नागरिकांचे घरावरुन व गच्चीवरुन गेलेल्या आहेत. त्यामुळे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच सदर वाहिन्यांचे खांब रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरत आहेत. तरी वरील ठिकामी धोकादायक ठरणाऱ्या खांब व तारा हलवून भूमिगत विजवाहिन्या टाकणेच्या कामासाठी र.रु.४८,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २१६ विषय क्रमांक :- १७
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.लता खोमणे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रहाटणी श्रीनगर परिसरातील वॉर्ड क्र.७७ मधील काही कॉलन्यांच्या उर्वरित ठिकाणी घराजवळुन तसेच काही घरांच्या गॅलरीतुन म.रा.वि.म.कंपनीच्या लघुदाब विजवाहिनी तारा गेलेल्या आहेत. पावसाळयात सदरच्या तारांमुळे नागरिकांच्या जिवितास धोका होण्याची शक्यता आहे. सबब सदरच्या तारा काढुन भुमिगत केबलव्दारे विजपुरवठा करणेच्या कामासाठी र.रु.४८,००,०००/- च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २१७ विषय क्रमांक :- १८
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.स्मिता गुंजेकर,मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव..

अ प्रभाग अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेकामी मजुर कर्मचारी (ठेकेदारी पध्दतीने ) पुरविणे या कामाच्या १ वर्षाच्या र.रु.१९,५०,०००/- सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २१८ विषय क्रमांक :- १९
दिनांक :- २०/११/२००९
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.स्मिता गुंजेकर,मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपाचे आरक्षण क्रं.४० अ पीसीएमटी बसडेपो येथील फर्निचर व केबिन्सचे र.रु.२२,५०,०००/- चे कामाची साईट बदलुन सदर काम चिंचवड येथील एल्प्रो कंपनीचे आवारात पिंपरी चिंचवड मनपाचे ब प्रभागाचे विभागीय कार्यालय करणेसाठी करण्यात यावे.जेणेकरुन सदर ठिकाणी मनपाचे ब प्रभाग कार्यालय स्थलांतरित करता येईल व त्यामुळे नागरीकांची सोय होईल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/९/कावि/१२७९/०९

दिनांक- २४/११/२००९ चे लगत

सही/-

उपनगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.